क्रमांक :- पोअचं/एसबी-१/ पदोन्नती - नापोशि/२०२०, चंद्रपूर दिनांक - 6 /०८/२०२०

# आदेश

खालील नमुद पोलीस शिपाईयांची त्यांचे जेष्ठतेनुसार त्यांना वेतन श्रेणी रूपये २५५०० - ८११०० एस ८ मध्ये या आदेशाचे तारखेपासून नाईक पोलीस शिपाई या पदावर सामान्य प्रशासन विभाग शासन,महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक - बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A भाग-१/१६-ब, दिनांक - २९/१२/२०१७ व महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक - बीबीसी-१२०७/प्र.क्र. ५३/०८/१६ ब, मंत्रालय मुंबई - ०३२, दिनांक १६/०६/२००८ अन्वये पदोन्नती देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक - पीएए-०३०५/प्र.क्र. १९०/पोल ५ अ, दिनांक ०५/०४/२००७ अन्वये तसेच सातव्या वेतनातील सुधारीत आदेशान्वये त्यांचे पदोन्नतीचे तारखेपासुन रूपये ७५० /- (रूपये सातशे पन्नास फक्त) विशेष वेतन मंजूर करण्यात येते.

ही पदोन्नती खालील अटीच्या अधीन राहुन देण्यात येत आहे.

**अटी:-**

१) संबंधीत लगत वरिष्ठ कर्मचारी मागास प्रवर्गातील असल्यास त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले असने आवश्यक राहील.

२) संबधीत जेष्ठ कर्मचारी यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यावर पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल.

३) सदर पदोन्नती ११ महिण्याकरीता वा जेष्ठ कर्मचारी जात वैधता प्रमाणपत्र सादर करेल यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यत सुरू राहील.

४) या तात्पूरत्या पदोन्नतीचा परिणाम कनिष्ठ कर्मचारी यांना सेवाजेष्ठतेचा हक्क मिळणार नाही. सदर तात्पूरत्या पदोन्नतीमुळे संबंधीत कर्मचाऱ्यांना नियमीत पदोन्नती म्हणजेच जेष्ठतेचे कोणत्याही प्रकारचे अधिकार प्राप्त होणार नाहीत.

५) संबधीत जेष्ठ कर्मचाऱ्यांने जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्यास पदोन्नती देण्यात येईल व आपणास पुर्ववत पदावनत करण्यात येईल.

६) सदर कर्मचाऱ्यापैकी ज्यांना कनिष्ठ पदावरील वेतन वाढ दिल्यानंतर वेतन निश्चिती करण्याबाबतचा विकल्प घ्यावयाचा असल्यास त्यांनी एक महिण्याचे आत सदरचा विकल्प संबंधीत लिपीकाकडे सादर करावा.

७) सदरहू आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ व उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मुळ याचीका क्र. ८४५२/०४ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निर्गमीत करण्यात येत आहेत.

८) जे कर्मचारी अनाधिकृतपणे गैरहजर तसेच सिक रजेवर असतील तर ते ज्या तारखेला कर्तव्यार्थ रूजू होतील तेव्हापासून त्यांचा पदोन्नती स्विकारल्याचा दिनांक ग्राहय धरण्यात येईल याबाबत अनुपालन अहवाल या कार्यालयास कळविण्यात यावा.

९) मागासवर्गीय पोलीस हवालदार यांची जात वैधता सादर केली असल्याचे अधिन राहून पदोन्नती देण्यात आलेली आहे. जात वैधता नसल्याचे निष्पन्न झाल्यास पुर्वीच्या पदावर पदावनत करण्यात येईल.

अपील प्रलंबित असेल किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील व ती शिक्षा या वित्तीय वर्षात संपुष्टात येत नसेल तर त्यांना पदावनत करण्यात येईल.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचेनाव | भरतीचा प्रवर्ग | पदोन्नती प्रवर्ग | जेष्ठतायादी अनु.क्रमांक | नेमणुक ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि/१७०६ मनोज वासुदेव वाढई | चांभार/अ.जा. | खुला | १७ | पो. स्टे. चंद्रपूर शहर |
| २ | पोशि/२२०६ विजय लळीराम यादव | अहिर/भज क | खुला | ३२ | पो. मु. चंद्रपूर |
| ३ | पोशि/१३६९ पंकज रमेश शिंदे | गाडीलोहर/भजब | खुला | ३५ | पो. स्टे. चंद्रपूर शहर |
| ४ | पोशि/१९२३ कौशलकुमार जयराम यादव | अहिर/भज क | खुला | ४१ | पो. स्टे. बल्लारशा/ सिसिटीएनएस, चंद्रपूर |
| ५ | पोशि/३५४ नितेश गणपतराव जिवतोडे | माना/खुला | खुला | ६९ | पो. स्टे. चंद्रपूर शहर |

सदर पदोन्नती आदेश चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाच्या www.chandrapurpolice.gov.in या संकेतस्थळावर फ्लॅश या शिर्षाखाली उपलब्ध आहेत.

पदोन्नती झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचे कडून अभिनंदन.

( डॉ. महेश्वर रेड्डी )
पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

प्रति,

वरील संबंधीतास

मार्फत व प्रतिलिपी :- प्रभारी अधिकारी, पो. स्टे. चंद्रपूर शहर, बल्लारशा
प्रभारी अधिकारी, सिसिटीएनएस, चंद्रपूर / रापोनि पो. मु. चंद्रपूर

प्रतिलिपी :- उप विभागीय पोलीस अधिकारी, चंद्रपूर, राजुरा यांना माहितीस

प्रतिलिपी :- पोलीस उप अधीक्षक (मुख्या), चंद्रपूर यांना माहितीस

प्रतिलिपी :- पगार लिपीक ३, ४, १४ / राजपत्र लिपीक / सआली ५, ६, ७ व ९ यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस.